# तोरण

अंक ९८–९९ एप्रिल ते सप्टेंबर २०१६

## अनुक्रमणिका

- संपादकीय
- महाराष्ट्रातले जनावरांचे बाजार
- तुम्हाला माहीत आहे का ?
- अंतरातील घडामोडी

देणगी मूल्य : रु. ५/-

## संपादकीय

### भारतातले जनावरांचे बाजार

आपल्या देशातले जनावरांचे बाजार हे रंगीबेरंगी मेळ्यांसारखे असतात. हे बाजार आठवड्याच्या एखाद्या वारी किंवा वार्षिक भरवले जातात. काही वेळेस ते एखाद्या उत्सवाच्या वेळी किंवा पौर्णिमा, अमावस्या अशा एखाद्या विशिष्ट तिथीच्या वेळीही भरवले जाऊ शकतात. उदा., मालेगावमध्ये येळ अमावस्येला जनावरांचा बाजार भरवला जातो. तसेच हे बाजार जनावरांच्या एखाद्या विशिष्ट प्रकाराकरताच म्हणजे फक्त गुरे, शेळ्या, मेंढ्या, म्हशी, उंट, घोडे किंवा गाढवं यांच्याकरताच भरवले जातात व काही वेळेस महाराष्ट्रातल्या देवणी बाजारासारखे एखाद्या विशिष्ट जातीपुरतेच भरवले जातात.

जनावरांच्या बाजाराला भेट देणे हा आपला कुतूहल वाढवणारा अनुभव असू शकतो. सर्वसाधारणपणे त्यांची मांडणी आपल्याला त्यांच्यात रस किंवा गोडी वाटेल अशा तऱ्हेची असते. सर्वप्रथम एकाच प्रकारची

जनावरे एकत्र ठेवलेली असतात. नंतर त्यांची देखभाल करायला लागणारी उत्पादने, म्हणजे खुंटाला बांधायच्या दोऱ्या, जाड दोर, चारा, ताडपत्र्या, कोकरांना बंदिस्त ठेवण्याकरता जाळी इ. पण बाजारात विक्रीसाठी ठेवलेले असते. वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या स्टॉलमधून कांबळी, टॉर्च, दिवे, कुत्र्याचे पट्टे व इतर किरकोळ वस्तूही विकायला आणलेल्या असतात. याशिवाय बाजाराला भेट देणाऱ्या लोकांकरता खाण्याची व चहाची दुकानेही असतात. बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना सर्व व्यवहाराकरता एक संपूर्ण दिवस लागू शकतो.

भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये जनावरांच्या बाजाराची भूमिका खूप महत्त्वाची आहे. पशुधन व पशुधनांची उत्पादने ही बऱ्याच अंतरावरून खरेदी-विक्रीसाठी येतात. उदा., हैद्राबादच्या बाजाराकरता दूरच्या राजस्थान व उत्तर प्रदेशातून जनावरे आणली जातात. तसेच आंध्र प्रदेशातल्या अनंतपूरमधली जनावरे कर्नाटक, तामीळनाडू व केरळपर्यंत प्रवास करतात.

जनावरांच्या बाजाराची भूमिका वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे बाजारांची देखभाल व्यवस्थित करणे हे खूप महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे बाजाराची व्यवस्था ग्रामपंचायत किंवा ब्लॉक ऑफिसकडे असते. कृषि उत्पादन बाजार समितीही (APMC) महत्त्वाची भूमिका बजावते. बाजारांचे व्यवस्थापन करण्याकरता समित्याही नेमलेल्या असतात.

जनावरांच्या बाजारामध्ये काही बाबींकडे आवर्जून लक्ष दिले पाहिजे. ह्या गोष्टी म्हणजे जनावरांकरता व बाजाराला भेट देणाऱ्या लोकांकरता पिण्याच्या पाण्याची तरतूद, निवारा व सावली मिळण्याकरता भरपूर झाडे, गाड्यांच्या पार्किंगकरता सोईस्कर जागा, जनावरांना आरामात गाड्यांमध्ये चढवण्या-उतरवण्याकरता रँपची सोय, बाजाराला भेट देणाऱ्या लोकांकरता स्वच्छतागृहे, वीज व पाण्याची चांगली सोय.

बाजारात रोगी व निरोगी दोन्ही प्रकारची जनावरे येतात. जर बाजाराच्या मांडणीच्या अगदी सुरुवातीलाच पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध केली तर आजारी जनावरांना वेगळे काढून उपचार करता येईल. जर जनावरांनी गजबजलेल्या बाजारात रोगी जनावरे शिरली तर त्यामुळे निरोगी जनावरांना बाधा होऊ शकेल. तसेच बाजाराच्या ठिकाणी जनावरांचे आरोग्य व व्यवस्थापन याबद्दलच्या माहितीची देवाणघेवाणही करता येईल.

सध्याच्या युगात, जगात फार जलद प्रगती होती आहे. त्यामुळे काही पशुउत्पादनाकरता हल्ली बाजारात जायची गरजच नाही. जिथे शेतकरी राहतात, तिथेच व्यापारी येतात व जनावरे आणि पशुउत्पादने खरेदी करतात व जिथे त्यांची गरज आहे तिथे विक्रीसाठी घेऊन जातात. इ-बाजाराद्वारे किंवा ओएलएक्स पोर्टलद्वारेही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जनावरांची खरेदी-विक्री होते. परंतु, जनावरांच्या बाजाराचे जर आस्तित्वच नाहीसे झाले तर ग्रामीण भागातील आपला एक वारसा व संस्कृतीचा महत्त्वाचा ठेवा नष्ट होईल.

**डॉ. नित्या घोटगे**

संचालिका, अंतरा, पुणे.

# महाराष्ट्रातले जनावरांचे बाजार

मी २०१५ मध्ये महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यातल्या काही गावी प्रत्यक्ष जाऊन जिथे जनावरांचे आठवडी बाजार भरतात तिथली माहिती गोळा केली. त्याचा तपशील मी पुढे देत आहे. सोलापूर, सातारा, नांदेड, हिंगोली, जालना इथे जाऊन, कोणत्या ठिकाणी कोणती जनावरे आणली जातात, त्यांचा प्रकार व जाती याबद्दल सर्वेक्षण केले. इथल्या अनुभवी व वयस्कर माणसांची गाठ घेतल्यावर त्यांनी इथे गेल्या ६०-७० वर्षांपासून जनावरांचे आठवडी बाजार भरवले जात आहेत असे सांगितले. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वारी हे बाजार भरत असतात. त्याची कल्पना यावी म्हणून पुढे एक टेबल देत आहे.

| अ.क्र. | बाजार भरण्याचे ठिकाण/गाव | बाजार भरण्याचे ठिकाण/गाव | आठवडी बाजार भरण्याचा दिवस | खरेदी-विक्रीसाठी बाजारात आणली जाणारी गुरे व प्रकार | जनावरांच्या जाती |
|---|---|---|---|---|---|
| १ | नातेपुते | सोलापुर | बुधवार | गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी | खिलार देशी, पंढरपुरी गावठी देशी, विजापुरी |
| २ | लोणंद, ७० ते ७५ वर्षापासून | सातारा | गुरुवार | गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी | खिलार देशी, पंढरपुरी गावठी देशी, विजापुरी |
| ३. | नायगाव ५० ते ५५ वर्षापासून | नांदेड | गुरुवार | गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी | लालकंधारी देशी, म्हैस मुऱ्ह, शेळी उस्मानाबादी |
| ४ | अर्धापूर ७० ते ८० वर्षांपासून | हिंगोली | शूक्रवार | गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी | लालकंधारी देशी, म्हैस मुऱ्ह, शेळी उस्मानाबादी |
| ५ | इतवारा बाजार ७० ते ७५ वर्षे | नांदेड | शनिवार | शेळी बाजार | उस्मानाबादी |
| ६. | कामठा बाजार ४० ते ५० वर्षे | नांदेड | रविवार | म्हैस बाजार | मूऱ्हा नागपुरी |
| ७ | जांब ३० ते ३५ वर्षे | नांदेड | सोमवार | गाय, बैल, म्हैस, शेळी | पंढरपुरी, नागपुरी (म्हैस), देवणी, गावठी (बैल) गाय, बैल (लालकंधारी), म्हैस (नागपुरी, पंढरपुरी), शेळी (उस्मानाबादि) |
| ८ | लोहा ६० ते ६५ वर्षापासून | नांदेड | मंगळवार | गाय, बैल, म्हैस, शेळी | पंढरपुरी, नागपुरी (म्हैस), देवणी, गावठी (बैल) गाय, बैल (लालकंधारी), म्हैस (नागपुरी, पंढरपुरी), शेळी (उस्मानाबादि) |
| ९. | परतुर ६० ते ७० वर्षापासून | जालना | शनिवार | गाय, बैल, म्हैस, शेळी | मेंढी जात संकरीत जनावरे |

जनावरांचा बाजार हा शक्यतो मध्यवर्ती ठिकाणी, शहरांत किंवा शहरालगत जिथे दळणवळणाची सुविधा असेल, जिथे पशुपालक व शेतकरी, व्यापारी यांना सहज पोचता येईल याचा विचार करून बाजार भरण्याचे ठिकाण ठरवले आहे. बहुतेककरून हा बाजार ग्रामपंचायतीमार्फत भरवला जातो. जे विक्रेते बाजारात जनावरे घेऊन येतात त्यांच्याकडून फी गोळा केली जाते. उदा. जनावरे जिथे थांबतात त्या जागेचे भाडे, पाणी व्यवस्था यासाठी दाखला बनवणे, इत्यादीसाठी ग्रामपंचायतीला ठराविक फी द्यावी लागते. बरेच वेळा जनावरांचे बाजाराशेजारीच शेतीमालाचा बाजारही भरवला जातो. परंतु या बाजाराचे व्यवस्थापन, फी आकारणी ही जबाबदारी कृषी उत्पन्न बाजार समितीकडे असते. प्रत्येक ठिकाणच्या आठवडी बाजारांत व्यापारी, पशुपालक, शेतकरी, असे सर्वसमाजाचे लोक येतात.

जनावरांचा बाजार व कृषी उत्पन्न बाजार यांच्यापासून थोड्याशा अंतरावर कातडीचा बाजार भरतो. या बाजारात मोठ्या जनावरांची कातडी विकली जाते. खेडेगावात ज्यावेळी अचानक एखादे जनावर किंवा वासरू मरते तेव्हा महार मांग समाजातील व्यक्ति मेलेल्या जनावरांची कातडी काढून बाजारात आणतात. एका मोठ्या जनावराच्या कातडीला १२०० ते १८०० रूपयापर्यंत भाव मिळतो. ही कातडी चांभार विकत घेऊन त्यापासून बूट, चपला, ताडपत्री बनवतात. याशिवाय चाबूक (आसूड), पाण्याची मोट बनविण्याकरिताही ही कातडी उपयोगात आणली जाते. अर्थात, सध्या शेतीतल्या यांत्रिकीकरणामुळे मोट बनवण्याचे काम खूपच कमी झाले आहे. शेळी-मेंढीची कातडी व्यापारी लोक खरेदी करून मोठ्या कंपन्यांना विकतात. चांभारही बूट, चपला, बनवण्याकरता कातडी खरेदी करतात. त्यांच्या मते शेळीची कातडी चपलांवर नक्षीकाम करण्याकरता खूपच चांगली असते. याशिवाय अशीही माहिती मिळाली की जनावरांच्या बाजारात आजारी जनावरेही विक्रीसाठी येतात. म्हणजे सड निकामी झालेल्या गायी म्हशी, सतत गर्भपात होणारी जनावरे, आजारी संकरीत जनावरे, वय झालेले बैल, दूध न देणाऱ्या गायी म्हशी अशी जनावरे फक्त खाटीकच खरेदी करतात. पशुपालक व शेतकरी सहसा आजारी जनावरे खरेदी करत नाही. नांदेड जिल्ह्यातल्या कामठा बाजाराबद्दल अशी माहिती मिळाली की इथे फक्त म्हशी विक्रीला येतात. जनावरांच्या बाजारात बैल व शेळी, मेंढीचे मटण विकले जाते, असे आढळून आले. बाजारात ज्वारीचा व मक्याचा कडबा, सुका चारा, हिरवा चारा विक्रीला आणला जातो.

शेळ्या मेंढ्यांची खरेदी जास्त करुन व्यापारी व खाटीक करतात. शेळ्या-मेंढ्या पाळण्याकरता खरेदी करणारे खूपच कमी आढळून आले. जनावरांकरता पिण्याच्या पाण्याची सोय कुठेच दिसली नाही. पशुपालक त्यांच्या गुरांकरता १ घागर पाणी, अंदाजे १२ लिटर, रु. ५/- देऊन विकत घेतात.

ह्या बाजारात पशुपालक व शेतकरी यांच्यामध्ये आपापसातील सबंध चांगले आहेत व त्यांची सुरळीतपणे देवाणघेवाण होत असते ही गोष्ट मला खूप चांगली महत्त्वाची वाटली.

## सातारा

### लोणंद बाजार

या बाजारात सातारा जिल्ह्यातल्या गावातून पशुपालक व शेतकरी आपआपली जनावरे विक्रिसाठी घेऊन येतात साधारण ६०-७० बैलजोड्या दर आठवड्याला विक्रीसाठी

येतात. तसेच बाजाराच्या दिवशी या ठिकाणी १५००–२००० शेळ्या व ६०००–७००० मेंढ्या विक्रीसाठी येतात. एका शेळीची व मेंढीची रू. १२००/– पर्यंत विक्री होते. बालींग्याला रू.१८००/–पर्यंत मिळतात. इथे मोठ्या संख्येने शेळ्या व मेंढ्या विक्रीसाठी येतात म्हणून हा बाजार शेळ्या–मेंढ्याकरता खूप प्रसिद्ध आहे. पुणे, मुंबई जेजुरी, फलटण, अलिबाग, कोकण, दौंड, सोलापूर भागातून व्यापारी व खाटीक शेळी मेंढी खरेदीसाठी येतात. तसेच या बाजारात खिलार जातींची बैल व गायी येतात. खिलार जातींची बैल जोडी ६० ते ९० हजारापर्यंत विकली जाते. संकरीत गायीही विक्रिसाठी येतात. परंतु म्हशींचे प्रमाण कमी आहे. या बाजारात मेंढीची लोकर विक्रीसाठी येते ती व्यापारी खरेदी करतात. बाजारात पडलेल्या शेणखताचा ग्रामपंचायतीकडून दरवर्षी लिलाव केला जातो. तसेच हिरवा चारा कडबाही बाजारात विक्रिसाठी येतो. बाजारात जनावरांना प्रवेश मिळण्याकरता ग्रामपंचायतीकडून फी आकारली जाते व गोळा केली जाते. मोठ्या जनावरांकरता प्रत्येकी ५ रु. व एका शेळी मेंढीस २ रु. आकार आहे. शेळी–मेंढीची चामडी खरेदी करण्याकरता पुणे, मुंबई, अलिबाग, सोलापूर व कोल्हापूर येथील व्यापारी येतात. लहान सहान खाटीक व मेंढपाळ शेळीमेंढीची चामडी विक्रीसाठी आणतात. दर आठवड्याला जवळपास १० ते १२ ट्रक/टेम्पो चामडी बाहेर जाते. शेळी मेंढीची चामडी रु.१०० ते १५० पर्यंत खरेदी केली जाते. यामध्ये ओल्या कातडीवर जास्त भर असतो. चामड्याचे फिनीशींग करुन व्यापारी ते ७० ते ८० रुपये स्क्वेअर फुटानी कंपनीला विकतात.

## सोलापूर

### नातेपुते बाजार

नातेपुते हे गाव रोडला लागून असल्यामुळे या बाजारात परिसरातील जवळपास ३५ ते ४० गावातून पशुपालक व शेतकरी, व्यापारी इ. येतात. दर आठवड्याला साधारण ३० ते ३५ म्हशी, ४० ते ४५ खिलार जातीची बैलजोडी, ८००–९०० मेंढी, २००–२५० शेळ्या विक्रीसाठी येतात.

तीन चार वर्षांची संकरीत वासरेही विक्रीसाठी आणली जातात. जनावरांचा हा बाजार मध्यम प्रमाणात भरतो. इथे दलाल व खाटीक यांचा वावर दिसून आला नाही. पूर्वी राजरोसपणे दलाल बाजारात यायचे. पण आता पशुपालक व मेंढपाळ स्वतःच खरेदी विक्रीचा व्यवहार करतात. साहजिकच दलालांचे महत्त्व कमी झाले आहे. चामड्याचा बाजार पूर्वी भरायचा पण अलिकडे भरत नाही. बाजारात ज्वारी, मका, बाजरीचा हिरवा व वाळलेला चारा विक्रीसाठी येतो. शेजारचे शेतकरी तो विक्रीसाठी घेऊन जातात. शेतमालाची करपावती कृषी उत्पन्न बाजार समितीकडून घ्यावी लागते. जनावरांच्या बाजाराची जबाबदारी ग्रामपंचायत सांभाळते. जनावरांचा दाखला बनविणे. बाजारात थांबण्याचे भाडे वगैरेकरता ग्रामपंचायत कर आकारते व रीतसर पावती देते. बाजारात पडलेल्या शेणखताची ग्रामपंचायतीकडून लिलाव पध्दतीने विक्री होत असे. परंतु अलिकडे शेणखत गोळा करण्याची मजुरी व लिलावाची रक्कम यांची सांगड बसत नाही. त्यामुळे लिलाव बंद झाला आहे. व्यापारी लोकही दिसत नव्हते. केवळ शेतकरी व पशुपालकच दिसत होते. जनावरे आसपासच्या खेड्यातून येतात व खेड्यापाड्यातच विकली जातात.

# नागपूर

मी नागपूर जिल्ह्यातील काही ठिकाणी, म्हणजे जिथे गुरांचा बाजार भरतो अशा ठिकाणी गवळव जातीच्या गुरांचे सर्वेक्षण करण्याच्या दृष्टीने भेट दिली. महाराष्ट्रातील देवणी, डांगी, खिलार, लालकंधारी अशा देशी व पारंपरिक गुरांच्या जातीप्रमाणेच गवळव ही विदर्भातील पारंपरिक गुरांची जात आहे. बाजार भरण्याचे ठिकाण, बाजाराचा दिवस, विक्रीला येणाऱ्या गुरांचे प्रकार दाखवणारे टेबल खाली दिले आहे.

| अ.क्र. | बाजार भरण्याचे ठिकाण/गाव | आठवडी बाजार भरण्याचा दिवस | खरेदी - विक्रीसाठी बाजारात आणली जाणारी गुरे व प्रकार | बाजारात येणाऱ्या गवळव गुरांचा समावेश |
|---|---|---|---|---|
| १. | कळमेश्वर | रविवार, सोमवार | देशी–गाय, बैल, म्हैस संकरीत –गाय, बैल संगमनेरी–शेळी, मेंढी व गावठी शेळी, मेंढी गवळव –गायबैल | गवळव गुरांचा एकंदरीत २० टक्के समावेश असतो. |
| २ . | काटोल | मंगळवार | देशी–गाय, बैल, म्हैस (नागपुरी) संकरीत–गाय, बैल, शळी, मेंढी –गावठी व संगमनेरी जातीची | गवळव २५ टक्के |
| ३ . | मोहपा (कळमेश्वर तालुका) | बुधवार | वरीलप्रमाणे | गवळव १० टक्के |
| ४ . | खापा (सावनेर तालुका) | शनिवार, रविवार | – | गवळव २० टक्के |
| ५ . | कळमाना | शुक्रवार | | गवळव १० टक्के |
| ६ . | बाजारगांव | गुरूवार | | गवळव १५ ते २०टक्के |

| दर वर्षाकाठी भरवल्या जाणाऱ्या यात्रा व ठिकाणे | | | |
|---|---|---|---|
| १ . | धापेवाडा यात्रा | दर वर्षी | आषाढीला भरते |
| २ . | आदासा यात्रा | दर वर्षी | जानेवारी महिन्यात भरते |
| ३ . | सिरपूर (भूयारी) | दर वर्षी | महाशिवरात्रीला भरते |
| ४ . | मोहपा यात्रा | प्रती वर्षातून चैत्र | महिना, दीपावली, दसरा, नवरात्रीला |

गवळव ही गाय–बैलाची जात आहे. इथले पशुपालक ह्या जातीच्या गुरांना गौरव आणि गावठी जात असे म्हणतात. गवळव हे नाव ते ओळखत नाहीत. गवळव गुराचा रंग पांढरा, भुरकट, कुसट असतो. शिंगे सरळ, मागे, समोर, सुंदर व आकर्षक असतात. शेपटी लांब असते. तिला इथले लोक गावरान शेपटी असे म्हणतात. दुधासाठी गवळव गाय चांगली असते. गाय एकावेळी २½ ते ३ लिटर दुध देते पण योग्य निगा व चांगला खुराक दिला तर ४ ते ५ लिटर दूध देऊ शकते. दुधाचा फॅट चांगला असतो.

गवळव गायीची किंमत १५ ते २० हजार असते. गवळव बैल शेतकऱ्यांसाठी मजबूत व दणकट असतो. वयाच्या ३ वर्षानंतर नर शेतकऱ्यांसाठी उपयुक्त होतो. गवळव बैलाची किंमत २० ते ६० हजारापर्यंत असते.

गवळव गुरांचा स्वभाव शांत असतो. ते शांतपणे चरतात. कुठल्याही हवामानात टिकण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यांची रोगप्रतिकारक शक्तीही चांगली असते. गवळव गुरांचे शेणखत शेतीसाठी खूप चांगले असते. इतर गुरांच्या तुलनेत, गौरव गुरांचे शेणखत, मूत्र, व गाईचे दूध खूप चांगले असते.

गेल्या १५ वर्षापासून गवळव गुरांची संख्या हळूहळू कमी कमी होत चालली आहे असे दिसून येते. इतर गुरांच्या तुलनेत या परिसरात गवळव जात केवळ २५% आहे. पुढील १५ वर्षात ही जात पूर्णपणे नाहीशी होईल अशीच लक्षणे दिसत आहेत.

हल्ली गवळव जातीचा फार विचार करत नाहीत. गवळव गुरांची ओळख, लक्षणे, महत्त्व यासंबंधी फक्त वयस्कर मंडळीच सांगू शकतात पण तरूण तसेच प्रौढ मंडळी गवळवसंबंधी माहिती देण्यास असमर्थ आहेत. कारण गवळव नेमके काय हेच त्यांना माहित नाही. नागपूरच्या आसपास जेथे बाजार भरतो तेथे गवळव गुरांची टक्केवारी ५ ते २५ एवढीच आहे. इतर सर्व गावठी व संकरीत जनावरेच दिसतात. केवळ डोंगर भागातील खेड्यापाड्यात गवळव गुरे थोडीफार दिसून येतात. तरूण पिढीला शहराचे आकर्षण असून पशुपालनात अजिबात रस नसल्यामुळे त्यांचे नोकरी किंवा काही व्यवसाय करण्याकडे जास्त लक्ष आहे. एकत्रित कुटुंबे विभक्त कुटुंबे झाली. त्या सर्व कारणांमुळे गवळव किंवा इतर गुरे पाळण्याकडे कल कमी झाला व गुरांची संख्याही कमी झाली. ज्यांच्याकडे गवळव व इतर जातीची जनावरे आहेत ते पशुपालक एक दोन गुराखी निवडतात व त्यांना प्रत्येक गुरामागे २०० रू. मोबदला देउन गुरे चारण्यास पाठवतात. एक गुराखी ५०–६० गुरांचा कळप घेऊन जातो. कळपात सर्वच प्रकारची व जातीची जनावरे असतात. त्यामुळे जनावर माजावर आल्यावर आपोआपच संकरण होते. गवळव जातही शुध्द राहिली नाही व त्यांची संख्या आणखी कमी झाली. गवळव गुरे सांभाळणारी काही वयोवृध्द मंडळीही जात टिकवण्याकरता, जनावर माजावर आल्यावर त्याला वळू न दाखवता सरकारी दवाखान्यात घेऊन जातात. परंतु तरीही त्यांना खात्री वाटत नाही असे ते म्हणतात. या परिसरातील जनावरांच्या आठवडी बाजारात येणाऱ्या पशुपालकांना प्रति जनावरामागे १० ते १५ रू. फी दयावी लागते. ग्रामपंचायतीकडून हा बाजार भरवला जातो. जेव्हा १५ ते २० वर्षापूर्वी गवळव गुरांची संख्या जास्त असायची तेव्हा या सर्व बाजारांना गौरवाचा बाजार म्हणून ओळखायचे. या परिसरात राजस्थान, गुजरात, येथून बरेच पशुपालक, विशेषत: गिरपालक स्थलांतर करून आलेले

आहेत. या स्थलांतरीत समाजात मालधारी व धनगर अशा लोकांचा समावेश आहे.

## वर्धा

नागपूर जिल्ह्यातील भरणाऱ्या आठवडी बाजाराशी इथल्या बाजाराची व गवळव गुरांची संख्या, परीस्थिती मिळती जुळती आहे. वर्धा जिल्ह्यातली गवळव गुरांची संख्या थोडीशी जास्त आहे पण एकूण प्रमाण दोन्ही जिल्ह्यांत कमीच आहे. बाजार भरण्याचे ठिकाण, बाजाराचा दिवस, बाजारात येणाऱ्या जनावरांच्या जाती दाखवणारे टेबल पान ६ वर दिले आहे.

नागपूरपेक्षा इथे पारंपरिक उपचार, औषधी वनस्पतीबद्दलचे ज्ञान कमी लोकांना माहिती आहे. पण पशुवैद्यकीय उपचार व सोयी, पशुवैद्यकीय डॉक्टरची सुविधा हे दोन्ही जिल्ह्यात सारखेच दिसून आले. या परीसरात पशुपालक संकरीत गुरांकडे जास्त प्रमाणात वळत आहेत. या भागातील आरवी गाव व त्याच्या आसपास थोड्या फार प्रमाणात गवळव जातीची गुरे अस्तित्वात आहेत. परंतू इतर भागातून म्हणजे जी गावे गवळव जातीकरता प्रसिध्द होती तिथे ही जात पूर्णपणे नाहीशी झालेली दिसली. बाजारात शेळी, मेंढी, कोंबडी यांचे मटणाची व चामड्याची विक्री केली जाते. हे लोक शेळ्या मेंढ्या बाजारात विक्रीसाठी आणतात. स्थानिक लोकांकडे शेळ्या- मेंढ्या खूपकमी आहेत. या परीसरात जनावरे आजारी पडली तर गावच्या पशुपालकांना सरकारी डॉक्टर उपलब्ध आहेत. रोगप्रतिबंधक लसीकरण व इतर उपचार वेळेवर मिळू शकतात. परंतू दुर्गंम भागातल्या जंगल व डोंगर भागातल्या पशुपालकांना, वाहनांची सोय नसल्यामुळे, वेळेवर डॉक्टर मिळणे खूप कठीण आहे. या भागातल्या काही लोकांना वनस्पती उपचार माहीत असतात. परंतू ज्यांना डॉक्टर मिळत नाहीत ते अशा वेळी स्थानिक वैदूंची मदत घेतात .

अंतरा संस्थेचे कार्य, पशुसंवर्धनाविषयी माहिती, वनस्पती औषधी व उपचार याबद्दलची माहिती सांगितल्यानंतर अशी माहिती व ज्ञान संस्थेकडून मिळाल्यास ती खूप मोलाची ठरेल अशी प्रतिक्रिया तिथल्या पशुपालकांनी व्यक्त केली.

दिलीप हालसे

# तुम्हाला माहीत आहे का ?

नवनवीन शोध व नवीन तंत्रज्ञान यांनी आपले आयुष्य सहज व सोपे केले आहे. आपल्या रोजच्या आयुष्यामध्ये आपण ते कुशलतेने वापरतो. कोणत्याही प्रकारचा कचरा (वेस्ट) असला तरी त्याची विल्हेवाट लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मग तो प्लास्टिक कचरा असो, सुया-इंजेक्शने अशा प्रकारचा कचरा असो किंवा घरातला अथवा इतर जातीचा कचरा असो. जर कचरा म्हणजे वेस्टची योग्य विल्हेवाट लावली नाही तर त्याचा माणसे व जनावरे दोघांच्याही आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो.

पूर्वी गावातून वेस्टसारखा कचरा म्हणजे प्लास्टिक वगैरेपासून निर्माण होणारा कचरा नव्हता. जो काही कचरा असायचा तो परत उपयोगात आणला जायचा किंवा त्यापासून दुसरे काहीतरी बनवले जायचे. आधुनिक तंत्रज्ञानाने आपल्याला अनेक उपयुक्त उत्पादने दिली आहेत पण त्याबरोबरच एक ''वेस्ट'' नावाची संकल्पनाही निर्माण केली आहे. वेस्टचा पुर्नवापर करणे अवघड असू शकते. आम्ही ह्या लेखात ३ प्रकारच्या वेस्टचा (ज्या ग्रामीण भागातही निर्माण होत आहेत) विचार केला आहे. ह्या वेस्टमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. ह्या समस्यांना कसे तोंड देता येईल याचा विचार करू या.

इ-वेस्ट म्हणजे निकामी किंवा जुन्या झालेल्या कॉम्प्युटर, टेलिव्हिजन, मोबाईल फोन यासारख्या विजेच्या किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तू. बऱ्याच इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे धातू किंवा इतर काही घटक असतात जे पुन्हा वापरण्याकरता परत मिळवता येतात. इ-वेस्ट म्हणजे बल्ब, बॅटरीसुद्धा घरगुती कचऱ्यात फेकू नये.

तुमच्या गावात बल्ब, बॅटरी वगैरे कामातून गेल्यावर त्या सर्व एकत्र गोळा करुन इ-वेस्ट सेंटरकडे पाठवायची व्यवस्था करा. याकरता तुम्हाला ग्रामपंचायत मदत करू शकेल.

आपल्या जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू घेतील अशा काही कंपन्या आहेत. त्या ह्या वस्तूंचे भाग सुटे करून वेगवेगळे करतात व आतील उपयुक्त साहित्य पुन्हा वापरतात. विशेषत: प्लास्टिक, काच व धातू यापैकी बरेचसे साहित्य नवीन वस्तू बनविण्याकरता वापरता येऊ शकते.

औषधाच्या बाटल्या, इंजेक्शने, सुया, बँडेज, कापूस, औषधाच्या गोळ्यावरचे कव्हर इ. (म्हणजे बायोमेडिकल वेस्ट) मध्ये रोगसंसर्ग होईल किंवा होऊ शकेल अशा गोष्टी असतात. फेकलेल्या सुया व इंजेक्शने यांच्यामुळे माणसांना व जनावरांना जखमाही होऊ शकतात. अशा प्रकारच्या वेस्टची विल्हेवाट करताना खूप काळजी घ्यायला हवी. शहरात अशा प्रकारची वेस्ट जाळली जाते. जर ही वेस्ट नीट जाळणे शक्य नसेल तर ही वेस्ट खोल गाडून टाकणे हा एक पर्याय आहे. ग्रामपंचायतीशी संपर्क साधला तर शासकीय सुविधेचाही फायदा घेता येईल.

ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये वापरलेल्या सुया, इंजेक्शने इ. प्रकारची वेस्ट गोळा करुन जवळच्या हॉस्पिटलमध्ये देता येते.

मोठ्या कंटेनरपासून ते मासे पकडायच्या जाळ्या, बाटल्या, बिस्किटे व चॉकलेटवरची आवरणे, कॅरी बॅगस् अशा अनेक गोष्टींकरिता सगळीकडे प्लास्टिक वापरले जाते. याचे कारण म्हणजे प्लास्टिक वजनाला हलके पण मजबूत, लवचिक व मुख्य म्हणजे स्वस्त असते. दरवर्षी सगळीकडे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या प्लास्टिक वेस्टमुळे जमिनी,

नदी किनारे, समुद्र दुषित होत असतात. गेली ५० वर्षे किंवा जास्तच, जगातले प्लास्टिकचे उत्पादन व वापर वाढतच चालले आहे. म्हणून आता आपल्याला थांबायला हवे. प्लास्टिक हे सर्वसाधारणपणे टिकाऊ साहित्य आहे. त्याचे नैसर्गिक विघटन होऊन ते नष्ट होत नाही. प्रकाशाच्या परिणामामुळे प्लास्टिकचे बारीक बारीक तुकडे होतात व पाण्याच्या प्रवाहाबरोबर हजारो मैल प्रवास करतात. यामुळे पाण्यातल्या वनस्पती, पाण्यातले प्राणी, वन्य प्राणी यांना धोका निर्माण होतो. किनाऱ्यावरही प्लास्टिक वेस्ट वाहून येते व साचते. पक्षी व इतर जनावरे हे प्लास्टिक खाण्याची शक्यता असते. गुरे, शेळ्या, मेंढ्या यांच्या पोटात जर हा प्लास्टिक कचरा गेला तर त्यांना पोटफुगीचा आजार होऊ शकतो. प्लास्टिक वेस्टची विल्हेवाट ही मोठी समस्या आहे.

काही संस्थांकडे प्लास्टिक वेस्टपासून इंधन म्हणजे पॉली इंधन तयार करणारे कारखाने आहेत. अशा प्रकारच्या काही सुरुवातीच्या कारखान्यापैकी एक जेजूरी इथे आहे.

कुठल्या प्रकारच्या वेस्टची कशी व्यवस्था लावायची याचा विचार करुन त्याप्रमाणे पाऊले उचलायला हवीत.

❈ ❈

## जनावरांचे स्वास्थ्य व कल्याण

१. **भूक व तहान यापासून मक्तता**

चांगले आरोग्य व उत्साह टिकून रहावा याकरिता पिण्याचे स्वच्छ पाणी व पोषक आहार यांची सहज उपलब्धता

२. **अस्वस्थतेपासून मुक्तता**

योग्य निवारा व विश्रांतीची आरामशीर जागा यांची सोय करुन योग्य वातावरण उपलब्ध करुन देणे

३. **वेदना, जखम व आजार यापासून मुक्तता**

याकरता प्रतिबंधक उपाय किंवा त्वरीत रोगनिदान व उपचार करणे

४. **सहज हालचाल करता यावी व नैसर्गिक वर्तन रहावे याकरता**

पुरेशी जागा, योग्य सुविधा व त्याच जातीच्या जनावरांची संगत यांची तरतूद करणे

५. **भिती व क्लेश यापासून मुक्तता**

मानसिक ताण व त्रास पडू नये याकरता अनुकूल परिस्थिती व वातावरण तसेच व्यवस्था असेल याची खात्री करुन घेणे

# अंतरातील घडामोडी

१) २५ एप्रिल २०१६ – ॲटम सोलर कंपनीने बनविलेला सोलर पंप ॲम्फेनॉल कंपनीच्या सहयोगाने रत्नागिरी जिल्ह्यात मोरवणे येथे २५ एप्रिल २०१६ रोजी बसवला.

२) जुलै २०१६ – 'गुड फूड' प्रकल्प. ग्रामीण भागामधली शिल्लक राहिलेली पीके, भाजी, फळे इ. शेती उत्पादने ही शहरी भागातील गरजूंना उपलब्ध करुन देणे हा उद्देश असलेल्या ''गुड फूड'' प्रकल्पाचा आरंभ. यामध्ये स्वयंशिक्षण प्रयोग (SSP), अंतराशी जोडलेले रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातले शेतकरी व युवा (YUVA) यांचा सहयोग.

३) ३–४ नोव्हेंबर २०१६ – संगीता खापरे यांनी एस एस पी ला भेट देऊन कोंबडीपालन व शेळीपालन यांचे प्रशिक्षण दिले. पहिल्या दिवशी ३० महिलांचा सहभाग तर दुसऱ्या दिवशी ५० महिलांचा सहभाग.

४) २८–२९ नोव्हेंबर २०१६ – युवातर्फे फेरीवाले, स्वयंपाकी महिला असे एकूण सातजण व SSP मधून चार महिला शेतकरी यांची रत्नागिरीला भेट. ह्या मंडळींनी फणस, कोकम यासारखी झाडे व वेगळी भाजी बियाणे आणि भाजी पहिल्यांदाच बघितली. प्रत्येकाने आपल्या भागामध्ये कोणता भाजीपाला जास्त होतो, कोणते पीक जास्त येते व शिल्लक राहते इ. विषयावर चर्चा करुन इतरांना ते वाजवी दरात देता येईल का याची चर्चा केली.

५) १४–१६ डिसेंबर – अंतरा संस्थेशी जोडलेले धनगर, संगीता खापरे व डॉ. नित्या घोटगे यांचा दिल्ली इथे हितसंबंधींच्या तीन दिवसाच्या मिटींगमध्ये सहभाग. यामध्ये भारतातल्या अनेक राज्यांच्या व इतर देशातल्या पशुपालकांचा सहभाग. ह्या मिटींगमध्ये पशुपालकांना आपापसात व सहकारी अधिकारी, संशोधक, शास्त्रज्ञ व राजकारण्याबरोबर चर्चा करण्याची संधी मिळाली. याचवेळी "Living lightly" हे पशुपालनावरचे प्रदर्शनही आयोजित केले होते.

६) ९–१० डिसेंबर २०१६ – युवा केंद्रामध्ये डोंबारी, आदिवासी, शेतीविषयक माहिती यावरची फिल्मस्‌चा कार्यक्रम आयोजित केला होता. ह्यामध्ये संगीता खापरे यांचा सहभाग होता व त्यांनी अतरा संस्थेची माहिती आणि शेती याबद्दलची माहिती दिली.

**अंतरा संस्थेची इ-मेलवरची नवीन प्रकाशने**

* बानाबाईचे घोडे
* Animal Welfare

आमच्या संकेतस्थळाला कृपया भेट द्या :

www.anthra.com व आमची नवीन मराठी प्रकाशने पहा

आता ''तोरण'' ही आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**